Varroc Engineering Ltd.

Regd. & Corp. Office

L-4, MIDC, Industrial Area
Waluj, Aurangabad 431 136
Maharashtra, India

Tel + 91 240 6653700
Fax + 91 240 2564540

email: varroc.info@varroc.com
www.varroc.com
CIN: L28920MH1988PLC047335

VARROC/SE/INT/2020-21/21 July 22, 2020

To,

(1) The Manager – Listing
The Listing Department,
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, Plot No. C/1, G Block,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai-400051.

NSE Symbol: VARROC

(2) The Manager - Listing
The Corporate Relation Department,
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai-400001.

BSE Security Code: 541578
Security ID: VARROC

Dear Sir/Madam,

Sub: Newspaper Advertisement - Information regarding 32nd Annual General Meeting of the Company ('AGM')

Ref.: Regulation 30 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirement) Regulations, 2015

We hereby enclose copies of newspaper advertisement published in the Business Standard (English) and Loksatta (Marathi), in compliance with Ministry of Corporate Affairs Circular No. 20/2020 dated May 5, 2020, in respect of information regarding 32nd AGM scheduled to be held on Friday, August 14, 2020 at 11:00 a.m. (IST) through Video Conference ('VC')/Other Audio Visual Means ('OAVM') without physical presence of the members.

Kindly take the same on your record and note the compliance.

Yours faithfully,
For Varroc Engineering Limited

AJAY KUMAR SHARMA

Digitally signed by AJAY KUMAR SHARMA
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=8e394f0b54df7a428a2c5037cce4c75628f0ab036b8fe3c204ae92155ac8623d,
postalCode=121004, st=HARYANA,
serialNumber=6874ec243b772feb55e68c4ac7af69e44bded0b2f83f14b155f3058c5ed4b3ae, cn=AJAY KUMAR SHARMA
Date: 2020.07.22 16:16:16 +05'30'

Ajay Sharma
Group General Counsel and
Company Secretary

Encl: e-newspaper clippings

CARE Ratings
Professional Risk Opinion

CARE Ratings Limited

(CIN:L67190MH1993PLC071691)
Regd. Office: 4th Floor, Godrej Coliseum, Somaiya Hospital Road, Off Eastern Express Highway, Sion (East), Mumbai 400022.

NOTICE

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, notice is hereby given that the meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on **Monday, August 10, 2020,** inter-alia, (a) To consider and approve the Unaudited Financial Results of the Company for the first quarter ended June 30, 2020. (b) To consider declaration of Interim Dividend, if any.
The Notice is also available on the Stock Exchanges website, **www.bseindia.com** & **www.nseindia.com** and Company's website **www.careratings.com**

For **CARE Ratings Limited**
Sd/-
Navin Kumar Jain
Company Secretary
ACS 10703

Place: Mumbai
Date: July 22, 2020

LAURUS Labs
Knowledge . Innovation . Excellence

Laurus Labs Limited

Registered Office: Plot No.21, Jawaharlal Nehru Pharma City, Parawada, Visakhapatnam – 531021, Andhra Pradesh
Corporate Office: 2nd Floor, Serene Chambers, Road No.7, Banjara Hills, Hyderabad – 500 034, Telangana
Phone: +91 40 3980 4333; Fax: +91 40 3980 4320
Email:secretarial@lauruslabs.com;Website:www.lauruslabs.com
CIN: L24239AP2005PLC047518

NOTICE

NOTICE is hereby given, pursuant to Regulation 29 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, that a meeting of the Board of Directors of the Company will be held on Thursday, July 30, 2020, inter-alia, to consider and approve the Un-audited Financial Results of the Company for the quarter ended June 30, 2020.
Further the Notice is also available on the website of the Company at www.lauruslabs.com.

By Order of the Board
For Laurus Labs Limited
Sd/- G. Venkateswar Reddy
Company Secretary

Place: Hyderabad
Date: July 21, 2020

apcotex industries limited

apcotex
Regd. Office:
Plot No.3/1, MIDC Industrial Area, Taloja - 410 208,
Dist. Raigad, Maharashtra Tel.: 2740 3500 Fax: 2741 2052
www.apcotex.com Email: redressal@apcotex.com
CIN: L99999MH1986PLC039199

NOTICE

Pursuant to Regulation 29 read with regulation 47 of the SEBI (LODR) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the company is scheduled to be held on **Thursday, the 30th July 2020** inter-alia to consider and approve the audited financial results for the quarter ended 30th June 2020.

The information contained in this notice is also available on the company's website www.apcotex.com and on the website of the Stock Exchanges, www.bseindia.com and www.nseindia.com

By order of the Board
For **Apcotex Industries Limited**
Sd/-
Anand V. Kumashi
Company Secretary

Place: Navi Mumbai
Date: 21st July, 2020

Jagran

JAGRAN PRAKASHAN LIMITED

CIN-L22219UP1975PLC004147
Registered Office: Jagran Building, 2, Sarvodaya Nagar, Kanpur-208005
Tel: +91 512 2216161, Fax: +91 512 2298040
Website: www.jplcorp.in, E-mail: investor@jagran.com

NOTICE

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 and other applicable regulations of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended from time to time, notice is hereby given that the Meeting of the Board of Directors of **Jagran Prakashan Limited** is scheduled to be held on **Friday, July 31, 2020** to, *inter-alia*, consider and approve the Unaudited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the quarter ended **June 30, 2020.**

The information contained in this notice is also available on the Company's corporate website www.jplcorp.in, on the website of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).

Pursuant to Code of Conduct to Regulate, Monitor and Report Trading by Designated Persons and Immediate Relatives as per Securities and Exchange Board of India (Prohibition of Insider Trading) Regulations, 2015, as amended from time to time, **theTrading Window has been closed from July 01, 2020 till the conclusion of 48 hours from the conclusion of the Board Meeting to be held on Friday, July 31, 2020.**

For Jagran Prakashan Limited
Sd/-
(Amit Jaiswal)
Company Secretary & Compliance Officer
Membership No.: F5863

Place: Kanpur
Date: July 21, 2020

JCT LIMITED

(CIN NO. L17117PB1946PLC004565)
REGD. OFFICE : VILLAGE CHOHAL, DISTT. HOSHIARPUR (PUNJAB) 146024
Phone: 01882-258780: Fax: 01882-258059, Website: www.jct.co.in, email:jctsecretarial@jctltd.com

STATEMENT OF AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH 2020

(Amount Rs. in lakhs)

Sl. No.	Particulars	QUARTER ENDED		YEAR ENDED	
		31.03.2020	31.03.2019	31.03.2020	31.03.2019
1	Total Income from Operations	15199	21836	69305	80033
2	Net Profit/(Loss) for the period before tax (before exceptional and/or extra ordinary items)	(622)	(267)	(4457)	(2338)
3	Net Profit/(Loss) for the period before tax (after exceptional and/or extra ordinary items)	(622)	(267)	(4457)	(2338)
4	Net Profit/(Loss) for the period after tax (after exceptional and/or extra ordinary items)	(622)	(266)	(4457)	(2337)
5	Total Comprehensive (Loss)/Income for the period /year (Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and other comprehensive Income (after tax)	(588)	(2806)	(2894)	(4523)
6	Equity Share Capital	20961	20961	20961	20961
7	Other Equity (Audited)	0	0	10759	13674
8	Earnings Per Share of Rs. 2.50 each (not annualised)				
	Basic (Rs) :	(0.07)	(0.04)	(0.53)	(0.38)
	Diluted Rs) :	(0.07)	(0.04)	(0.53)	(0.36)

Notes :

1. The above is an extract of the detailed format of Annual finanical results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the above financial results of the Company is available on the website of BSE Limited i.e. www.bseindia.com, the Stock Exchange where the Company's shares are listed and on the website of the Company i.e. www.jct.co.in.
2. The above results are reviewd by audit committee and have been approved by Board of Directors in its Meeting on 20th July, 2020.
3. Figures for the previous period have been regrouped wherever necessary.

For and on Behalf of JCT Limited
Samir Thapar
Chairman & Managing Director
DIN: 00062287

Place : Hoshiarpur
Dated : 20.07.2020

Shanthi Gears

SHANTHI GEARS LIMITED

murugappa

CIN: L29130TZ1972PLC000649
Regd. Office: 304-A, Trichy Road, Singanallur, Coimbatore-641 005. Tamil Nadu
Tel: +91-422-4545745 Fax: +91-422-4545700 Email: cs@shanthigears.murugappa.com, Website:www.shanthigears.com

Extract of Unaudited Financial Results for the Quarter ended 30 June 2020

₹ Crores

SI No	PARTICULARS	Quarter ended 30.06.2020	Quarter ended 30.06.2019	Year ended 31.03.2020
1	Total income from operations	26.93	72.67	248.82
2	Profit for the period before tax	(4.54)	12.61	32.69
3	Profit for the period after tax	(3.58)	9.45	25.19
4	Total Comprehensive Income for the period	(3.58)	9.45	24.30
5	Equity Share Capital	7.67	7.67	7.67
6	Reserves (Other Equity)			220.95
7	Earnings Per Share (in ₹)			
	Basic:	(0.47)	1.22	3.28
	Diluted :	(0.47)	1.22	3.28

Note:

1. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Results are available on the Stock exchange websites www.bseindia.com, www.nseindia.com and on the Company's website www.shanthigears.com.

For Shanthi Gears Limited
L. Ramkumar
Chairman

Place : Chennai
Date : 21 July 2020

varroc

Varroc Engineering Limited

CIN: L28920MH1988PLC047335
Registered Office: L-4, MIDC Area, Waluj,
Aurangabad- 431 136, Maharashtra
Tel: +91 240 6653 700, Fax: +91 240 2564 540
web: www.varroc.com, E-mail: investors@varroc.com

INFORMATION REGARDING 32ND ANNUAL GENERAL MEETING OF THE COMPANY

NOTICE is hereby given that 32nd Annual General Meeting ('AGM') of the members of the Company is scheduled to be held on Friday, August 14, 2020 at 11.00 a.m. (IST) through Video Conference ('VC')/Other Audio Visual Means ('OAVM') without physical presence of the members at a common venue, in compliance with the provisions of the Companies Act, 2013, (the 'Act') MCA circulars dated May 5, 2020 read with circulars dated April 8, 2020 and April 13, 2020 (collectively referred to as 'MCA circulars') and SEBI circular dated May 12, 2020, to transact the business as set out in the Notice convening 32nd AGM. Members will be able to attend and participate in the AGM by VC/OVAM only. Members attending the AGM through VC/OAVM will be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Act.

In compliance with the aforesaid MCA circulars and SEBI circular, Notice of 32nd AGM and Annual Report for FY 2019-20 will be sent only by electronic mode to all the Members whose email addresses are registered with the Depository Participants or the Company. Members holding shares in dematerialised mode are requested to register / update their email addresses with their Depository Participants ("DP") by following procedure prescribed by DP or alternatively, temporarily register/update their email addresses with the Company by writing to the Company's Registrar and Share Transfer Agent, Link Intime India Pvt Ltd at rnt.helpdesk@linkintime.co.in.

The Company has engaged services of NSDL for providing remote e-voting facility ('remote e-voting') to all its members to cast their vote on all resolutions set out in the Notice of 32nd AGM. Additionally, the Company is providing the facility of voting through e-voting system during the AGM ('e-voting'). The details such as manner of (i) registering / updating email addresses, (ii) casting vote through remote e-voting/e-voting and (iii) attending the AGM through VC / OAVM has been set out in the Notice of the AGM which will despatched in due course.

The Board of Directors had declared and paid interim dividend of Rs.3/- per share, during FY 2019-20. The Board, with a view to conserve cash for continuing its business operations smoothly and given the uncertainties associated with the nature of COVID-19 pandemic and its duration, has recommended that the interim dividend which has already been declared and paid be considered as the final dividend for the FY 2019-20.

The Notice of 32nd AGM and Annual Report for FY 2019-20 will also be made available on the Company's website at www.varroc.com, website of the stock exchanges, i.e., BSE Limited at www.bseindia.com and National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com and also on the website of NSDL at www.evoting.nsdl.com.

For **Varroc Engineering Limited**
By Order of the Board of Directors

Sd/-
Ajay Sharma
Group General Counsel and
Company Secretary
Membership No. - ACS 9127

Place: Aurangabad
Date : July 21, 2020

BAJAJ FINANCE LIMITED

CIN: L65910MH1987PLC042961
Registered Office: Akurdi, Pune - 411 035 | **Corporate Office:** 4th Floor, Bajaj Finserv Corporate Office, Off Pune - Ahmednagar Road, Viman Nagar, Pune - 411 014 | **Tel.:** 020-30405060 **Fax:** 020-30405030
E-mail ID: investor.service@bajajfinserv.in | **Website:** www.bajajfinserv.in/corporate-bajaj-finance

Extract of unaudited consolidated financial results for the quarter ended 30 June 2020

(₹ In Crore)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30.06.2020 (Reviewed)	Quarter ended 30.06.2019 (Reviewed)	Year ended 31.03.2020 (Audited)
1	Revenue from operations	6,648.20	5,805.48	26,373.80
2	Profit before tax	1,309.69	1,851.42	7,322.12
3	Profit after tax	962.32	1,195.25	5,263.75
4	Total comprehensive income (Comprising profit for the period and other comprehensive income after tax)	908.68	1,198.88	5,148.49
5	Paid-up equity share capital	120.08	115.49	119.99
6	Other equity as shown in the Balance Sheet of the previous year			32,207.64
7	Earnings per share (Not annualised) (Face value of ₹2 each)			
	Basic (₹)	16.04	20.71	89.77
	Diluted (₹)	15.93	20.55	89.07

Key standalone financial information is given below: (₹ In Crore)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30.06.2020 (Reviewed)	Quarter ended 30.06.2019 (Reviewed)	Year ended 31.03.2020 (Audited)
1	Total Income	5,901.73	5,304.29	23,834.15
2	Profit before tax	1,183.97	1,744.04	6,808.13
3	Profit after tax	869.50	1,124.73	4,881.12

Note: The above is an extract of the unaudited financial results for the quarter ended 30 June 2020 which have been reviewed by the Audit Committee and approved by Board of Directors at its meeting held on 21 July 2020, subjected to limited review by statutory auditors and filed with the stock exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended. The full format of the aforesaid financial results is available on the website of the Company, BSE Limited and National Stock Exchange of India Limited i.e. www.bajajfinserv.in/corporate-bajaj-finance, www.bseindia.com and www.nseindia.com respectively.

By order of the Board of Directors
For **Bajaj Finance Limited**

Pune
21 July 2020

Rahul Bajaj
Chairman

BAJAJ FINSERV LIMITED

CIN: L65923PN2007PLC130075
Registered Office: Mumbai - Pune Road, Akurdi, Pune 411 035
Corporate Office: Off Pune - Ahmednagar Road, Viman Nagar, Pune - 411 014
Website: www.bajajfinserv.in | **E-mail ID:** investors@bajajfinserv.in | **Telephone:** +91 20 27472851

Extract of consolidated unaudited financial results for the quarter ended 30 June 2020

(₹ In Crore)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30.06.2020 (Reviewed)	Quarter ended 30.06.2019 (Reviewed)	Year ended 31.03.2020 (Audited)
1	Revenue from operations	14,189.99	12,271.66	54,346.69
2	Profit before tax	2,568.08	2,255.24	8,301.66
3	Profit for the period (attributable to owners of the company)	1,215.15	845.34	3,369.13
4	Total comprehensive income (attributable to owners of the company)	1,580.16	1,073.47	3,882.47
5	Paid-up equity share capital	79.57	79.57	79.57
6	Other equity (as shown in the Balance Sheet of previous year)			31,221.68
7	Basic and diluted earnings per share (₹) (not annualised) (Face value of ₹5 each)	76.4	53.1	211.7

Key standalone financial information is given below: (₹ In Crore)

Sr. No.	Particulars	Quarter ended 30.06.2020 (Reviewed)	Quarter ended 30.06.2019 (Reviewed)	Year ended 31.03.2020 (Audited)
1	Total income	37.94	31.54	815.16
2	Profit before tax	3.19	0.71	681.88
3	Profit after tax	1.04	0.49	666.86

Note: The above is an extract of the unaudited financial results for the quarter ended 30 June 2020 which have been reviewed by the Audit Committee, approved by Board of Directors at its meeting held on 21 July 2020, subjected to limited review by statutory auditors and filed with the stock exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, as amended. The full format of the aforesaid financial results is available on the website of the Company, BSE Limited and National Stock Exchange of India Limited i.e. www.bajajfinserv.in, www.bseindia.com and www.nseindia.com respectively.

By order of the Board of Directors
For **Bajaj Finserv Limited**

Pune
21 July 2020

BAJAJ FINSERV

Sanjiv Bajaj
Chairman and Managing Director

राज्यभरातील हौशी रंगकर्मींची शासनाकडूनच आर्थिक कोंडी!

५१५ मराठी, हिंदी नाट्य संस्थांच्या सादरीकरणाचे पैसे थकवले; सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे वित्त विभागाकडे बोट

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : स्वतः पदरमोड करून हौशी रंगभूमीच्या माध्यमातून नाटकाचे क्षितिज व्यापक करणाऱ्या रंगकर्मींची खुद्द शासनाकडूनच आर्थिक कोंडी केली जात आहे. कलाप्रेमी वैगेरे असल्याचे मोठमोठे दाखले देणाऱ्या राज्य सरकारने राज्य नाट्य स्पर्धेत आपले नाट्य सादर करणाऱ्या राज्यभरातील ५१५ मराठी, हिंदी नाट्य संस्थांच्या सादरीकरणाचे सुमारे पाच कोटी रुपये थकवले असून काही संस्थांनी कर्ज घेऊन नाटक उभे केले. ते कर्ज फेडायचे कसे, असा या रंगकर्मींचा सवाल आहे. यापेक्षा संतापजनक बाब म्हणजे, हौशी रंगकर्मींची आर्थिक हतबलता माहिती असूनही सांस्कृतिक कार्य संचालनालय व वित्त विभाग एकमेकांकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सांस्कृतिक संचालनालयातर्फे नोव्हेंबर महिन्यात राज्यातील १९ केंद्रांवर झालेल्या मराठी राज्य नाट्य स्पर्धेत ४३४ नाट्य संस्थांनी तर हिंदी नाट्य स्पर्धेत चार केंद्रांवर ८१ संस्थांनी सादरीकरण केले. नोव्हेंबरमध्येच नागपुरात हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी झाली. त्यानंतर जानेवारीत अंतिम फेरी औरंगाबादला झाली. फेब्रुवारीत हिंदी हौशी नाट्य अंतिम स्पर्धा नागपुरात झाली.

गिरगाव, मुंबई, ठाणे, डोंबिवली, रत्नागिरी, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या ठिकाणी स्पर्धेची प्राथमिक फेरी झाली असून एकूण ४५० नाटके या स्पर्धेत सादर करण्यात आली. साधारण सहा ते सात हजार कलावंत व पडद्यामागील इतर कारागीर या स्पर्धेत सहभागी झाले होते. शासनाकडून सादरीकरणाची रक्कम मिळेलच या आशेवर काही संस्थांनी कर्ज घेऊन नाटक उभे केले. परंतु स्पर्धा होऊन वर्ष सरत आले तरी सादरीकरणाचे पैसे मिळाले नाहीत. केवळ सादरीकरणाची रक्कमच नाही तर अंतिम राज्य नाट्य स्पर्धेतील विजेत्यांना व कलावंतांना पारितोषिकाची रक्कमही अद्याप मिळालेली नाही.

असे असते आर्थिक गणित...

सर्वच हौशी कलावंत दोन-दोन महिन्यांआधी नाटकाच्या तालमी करतात. या तालमीसाठी सुद्धा एक विशिष्ट रक्कम खर्च होत असते. नाटक सादर करण्यासाठी लागणारे नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, प्रवास, निवास, भोजन आदींसाठी एका नाट्य संस्थेला १५ ते २० हजार रुपये खर्च येतो. यातही शासनाकडून प्राथमिक फेरीला फक्त सहा हजार तर अंतिम फेरीला दहा हजार रुपये दिले जातात. शासनाकडून मिळणारा खर्च हा प्रत्यक्ष खर्चाहून कमीच असतो. परंतु केवळ रंगदेवतेच्या आस्थेपोटी कलावंत नाटकाची पूजा बांधत असतात.

नाट्य स्पर्धेचे केंद्र व सहभागी संस्थांची संख्या

हिंदी -	मुंबई २५
केंद्र सहभागी संस्था	कलावंत - ४३१
पुणे २३	मराठी -
नागपूर २०	केंद्र १९
ठाणे १३	संस्था ४३८
	कलावंत - ६,५७०

“ अतिशय प्रतिकूल स्थितीत आम्ही नाटक सादर करीत असतो. शासनाजवळ पैसे नसतील तर सांस्कृतिक संचालनालयाने पारितोषिकांची रक्कम नंतर द्यावी. पण, आमचे किमान सादरीकरणाचे पैसे तरी द्यावे. सध्या अनेक कलावंतांची आर्थिक स्थिती चांगली नाही.

— सलिम शेख, नाट्य कलावंत व दिग्दर्शक.

“ मराठी राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी नाट्य संस्थांच्या सादरीकरणाचे पैसे मंजूर झाले आहेत. लवकरच हे पैसे त्यांना मिळतील. कुठल्याही नाट्य संस्थेचे पैसे थांबवले जाणार नाहीत. सध्या करोनामुळे या प्रक्रियेला उशीर होत आहे.

— विभिषण चवरे, संचालक, सांस्कृतिक संचालनालय.

मुंबईत करोना वाढल्याने राज्यपाल नागपूर मुक्कामी?

आज दुपारी आगमन

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : मुंबईत करोनाची साथ वाढल्याने व विषाणूने राजभवनात शिरकाव केल्याने महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोशियारी नागपूरला काही दिवसांच्या मुक्कामासाठी येत असल्याची माहिती आहे. बुधवारी २२ जुलैला दुपारी १२ वाजता त्यांचे आगमन होत आहे. विशेष म्हणजे, दौऱ्यात त्यांच्या परतीच्या प्रवासाचा उल्लेख नाही. तसेच सार्वजनिक कार्यक्रम किंवा बैठकीला ते उपस्थित राहणार असल्याचेही नमूद नाही.

२२ जुलैला दुपारी १२ वाजता राज्यपालांचे नागपूर येथे शासकीय विमानाने आगमन होईल व तेथून ते थेट राजभवनावर जातील. त्यानंतरचा त्यांचा पूर्ण वेळ राखीव आहे. राज्यपालांसाठी राजभवन सज्ज करण्यात आले आहे. दरम्यान,



महाराष्ट्रात मुंबई, पुणे आणि नागपूर येथे राज्यपालांचे निवासस्थान (राजभवन) आहेत. मुंबईत करोनाची साथ जोरात आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात करोना राजभवनापर्यंत पोहोचला. तेथील १६ कर्मचारी बाधित झाले. पुण्यातही ही साथ जोरातच आहे. त्या तुलनेत नागपूर सुरक्षित आहे. त्यामुळे राज्यपाल काही दिवस नागपूरला राजभवनात मुक्कामी राहण्याची शक्यता आहे. यासंदर्भात राजभवनातील अधिकारी रमेश येवले यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, ‘हे राज्यपालांचे निवासस्थान आहे. ते येथे कधीही येऊन राहू शकतात.’’

वॅरॉक इंजिनियरिंग लिमिटेड
सीआयएन: L28920MH1988PLC047335
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट नं. एल -४, एमआयडीसी औद्योगीक क्षेत्र, वाळूज, औरंगाबाद - ४३११३६, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी क्रमांक: +९१ २४० ६६५३७००; फॅक्स नं: +९१ २४० २५६४५४०
संकेतस्थळ : www.varrocgroup.com; ई-मेल आयडी: investors@varroc.com

कंपनीचा ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंदर्भात सूचना

याद्वारे अशी सूचना देण्यात येते आहे की, वॅरॉक इंजिनियरिंग लिमिटेड (‘कंपनी’) ची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (सभा) शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट, २०२० या दिवशी भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ११:०० वाजता, सदस्यांचा प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय व्हिडीओ कॉन्फरसिंग (व्हीसी)/अन्य दृकश्राव्य स्वरूपात (ओएव्हीएम), कंपनी कायदा, २०१३, मिनिस्ट्री ऑफ कार्पोरेट अफेयर्स परिपत्रक दि. ५ मे २०२०, परिपत्रक दि. ८ एप्रिल २०२० आणि १३ एप्रिल २०२० (एकत्रितपणे ‘एमसीए परिपत्रके’) आणि सेबीचे दि. १२ मे २०२० रोजीचे परिपत्रक, तरतुदींनुसार पालन करुन संपन्न होईल. या सर्वसाधारण सभेतील कामकाज हे सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिल्याप्रमाणे हाती घेतले जाईल. सदरील सभेत सदस्यांना फक्त व्हीसी/ओएव्हीएमद्वारे उपस्थित राहता येईल. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांची हजेरी कंपनी कायद्याच्या कलम १०३ च्या तरतुदी नुसार ग्राह्य धरण्यात येईल.

वर नमूद केलेल्या एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रक, ह्यांच्या अनुषंगाने ३२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेची आणि वित्तीय वर्ष २०१९-२० साठीचा वार्षिक लेखापरीक्षित अहवाल, यांची फक्त इलेक्ट्रॉनिक प्रत ज्या सर्व सदस्यांचे ईमेल आयडी, कंपनी / डिपॉझिटरी पार्टीसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत त्यांनाच पाठविले जातील. डिमॅट स्वरूपातील समभागधारकांनी ईमेल आयडी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडून विहित केलेल्या पद्धतीनुसार नोंदणीकृत / अद्ययावत करून घ्यावा किंवा ते तात्पुरत्या स्वरूपात नोंदणीकृत / अद्ययावत करून घेण्यासाठी कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडशी rnt.helpdesk@linkintime.co.in या पत्त्यावर लेखी संपर्क साधावा.

सदस्यांना सभेच्या स्थानापेक्षा इतर ठिकाणांवरून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करुन ३२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर त्यांचे मत नोंदवण्याची (‘दूरस्थ ई- मतदान’) (Remote e-voting) सुविधा एनएसडीएल द्वारे प्रदान करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त, कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा सुरु असताना सुद्धा ई- मतदान (e-voting) करण्याची सुविधा उपलबध करून देणार आहे. खालील बाबतींचा विस्तृत तपशील जसे की (१) ईमेल आयडी नोंदणीकृत / अद्ययावत करणे, (२) दूरस्थ ई-मतदान / ई-मतदान द्वारे मतदान करणे आणि (३) व्हीसी/ओएव्हीएम द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहणे, लवकरच पाठवण्यात येणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केला आहे.

संचालक मंडळाने वित्तीय वर्ष २०१९-२० दरम्यान रु. ३/- प्रति समभाग अंतरिम लाभांश जाहीर केला आणि वितरित केला. व्यवसायाचे कामकाज सुरळीत सुरू ठेवण्यासाठी रोखीचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने, कोविड १९ महामारी संबंधित अनिश्चिततेमुळे आधी घोषित आणि वितरित केलेला अंतरिम लाभांश वित्तीय वर्ष २०१९-२० साठीचा अंतिम लाभांश मानला जावा अशी शिफारस संचालक मंडळाने केली आहे.

वित्तीय वर्ष २०१९-२० साठीच्या कंपनीच्या ३२ व्या सभेची नोटीस आणि लेखापरीक्षित वार्षिक अहवालाची प्रत www.varroc.com या कंपनीच्या संकेतस्थळावर व तसेच www.bseindia.com या बीएसई लिमिटेड व www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड, निर्देशांकाच्या संकेतस्थळावर आणि www.evoting.nsdl.com या एनएसडीएलच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दिनांक: २१/०७/२०२०
ठिकाण: औरंगाबाद

वॅरॉक इंजिनियरिंग लिमिटेड करिता
सही /-
अजय शर्मा
ग्रुप जनरल काउंसेल आणि कंपनी सचिव
सदस्यता क्रमांक - ACS ९१२७

वनखात्याचे कायदे ना पर्यावरणहिताचे, ना रोजगारक्षम!

वनखात्याच्या अधिकाऱ्यांसमोरच गडकरींची सडकून टीका

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : पर्यावरण संवर्धनासोबतच जगण्यासाठी रोजगार देखील आवश्यक आहे. मात्र, वनखात्याचे कायदे ना पर्यावरणाचे संवर्धन करत, ना जंगलालगतच्या आदिवासींना रोजगार उपलब्ध करून देत आहे, अशी सडकून टीका केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली. वनखात्याच्या अधिकाऱ्यांसमोरच त्यांनी वनखात्याच्या उणिवांवर बोट ठेवले.

भारतातील पहिल्या बांबू उद्यानाची निर्मिती करणाऱ्या एका वनक्षेत्रपालाच्या ऑनलाईन सत्कार सोहोळ्यात त्यांनी वनखात्याचे कायदे आणि खात्याची कार्यशैली याचा चांगलाच समाचार घेतला. चीनसारखा देश ५० हजार कोटींची बांबूवर आधारित अर्थव्यवस्था उभी करतो आणि भारतात पाच ते दहा टक्केही काम होऊ शकत नाही. प्रत्येकवेळी कायदा अडसर ठरतो. परिणामी, लोक वन लावायला तयार होत नाहीत. अशावेळी वनांचे संवर्धन होणार कसे, असा प्रश्न गडकरी यांनी उपस्थित केला. चारपदरी रस्ता निर्मिती करताना दोन्ही बाजूला बांबू व झाडे लावण्याचा विषय मांडला तेव्हा आमच्याच अधिकाऱ्यांनी विरोध केला. कारण काय तर रस्त्याचे विस्तारीकरण करताना वनखात्याचे अधिकारी या लावलेल्या वृक्षांना वने घोषित करतील आणि रस्त्याचा विस्तार होणार नाही. पर्यावरण संवर्धन आवश्यक आहे, पण बेरोजगारी दूर करणेही तेवढेच आवश्यक आहे. पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यातून मध्यमार्ग शोधावाच लागेल. बांबू ही गवत प्रजाती असताना इतके वर्षे त्यावर वनखात्याच्या कायद्यांनी बंधने घालून ठेवली होती. परिणामी, आईस्क्रीमचे चमचे, अगरबत्त्यांसाठी लागणाऱ्या काड्या विदेशातून मागवाव्या लागल्या. आता अगरबत्त्यांच्या काड्यांचा प्रश्न सुटला तरी आईस्क्रीम चमच्यांचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे हे चमचे तयार करण्यासाठी लागणाऱ्या बांबूची प्रजाती उत्तर-पश्चिमेकडून मिळत नसेल तर चीनमधून ती आणून त्याची लागवड करा, असा सल्लाही गडकरी यांनी दिला. हे चमचे तयार करण्याचे कारखाने उभारले तर आदिवासींनाही रोजगार मिळेल. राज्यातील ८० टक्के जंगल विदर्भात असतानादेखील सिंधुदुर्ग जिल्ह्यात उत्तम दर्जाचे फर्निचर तयार होते, ते विदर्भात का होऊ शकत नाही. मग आम्ही तुम्हाला येथे का ठेवायचे, असा प्रश्न त्यांनी अधिकाऱ्यांसमोरच उपस्थित केला. वनखाते वनेही वाढवत नाहीत आणि अर्थव्यवस्था उभारणीत योगदानही देत नाही. त्यांनी कायद्याचा अडसर दूर सारून समस्या सोडवणे आवश्यक आहे. रोजगारनिर्मितीत आवश्यक बांबू लावला तर तो पूर्ण खरेदी करण्याची हमी यावेळी गडकरी यांनी दिली.



“ पर्यावरण संवर्धन आवश्यक आहे, पण बेरोजगारी दूर करणेही तेवढेच आवश्यक आहे. पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यातून मध्यमार्ग शोधावाच लागेल. वनखाते वनेही वाढवत नाहीत आणि अर्थव्यवस्था उभारणीत योगदानही देत नाही. त्यांनी कायद्याचा अडसर दूर सारून समस्या सोडवणे आवश्यक आहे.

नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री

करोना रुग्णांसाठी पालिकेकडून अधिक दराने गोळ्यांची खरेदी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : राज्य सरकार करोना रुग्णांसाठी प्रतिनग ५८ रुपये दराने फेविपीरावीर औषधाच्या गोळ्या खरेदी करण्याच्या तयारीत असतानाच पालिकेने मात्र २० रुपये अधिक दर देऊन त्याच गोळ्या खरेदीचा घाट घातला आहे.

करोनाची बाधा झालेल्या ६० वर्षांवरील व्यक्तींना फेविपीरावीर गोळ्या देण्यात येतात. पालिकेने या गोळ्यांच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविली होती. निविदा प्रक्रियेमध्ये एक गोळी ७८ रुपये दराने खरेदी करण्याचे कंत्राट पालिकेने एका कंपनीला दिले आहे. २०० मिलिग्रॅमच्या तब्बल दोन लाख ३१ हजार गोळ्या खरेदी करण्याचे कंत्राट पालिकेने कंपनीला दिले आहे. ६० वर्षांवरील रुग्णांची संख्या लक्षात घेता पालिका अतिरिक्त गोळ्या खरेदी करीत असल्याची बाब समाजवादी पार्टीचे गटनेते रईस शेख यांनी पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांना पत्र पाठवून निदर्शनास आणून दिली होती. आता राज्य सरकारने याच गोळ्या प्रतिनगर ५८ रुपये दराने खरेदी करण्याची तयारी सुरू केली आहे. राज्य सरकार सहा लाख ८० हजार गोळ्या खरेदी करणार आहे. एका पाकिटात ३४ गोळ्या असतात. सरकार ३४ गोळ्यांचे एक पाकीट १९९९.२० रुपये दराने खरेदी करणार आहे.

पारंपरिक भात शेतीला आधुनिकतेचे बळ

कल्पेश भोईर , लोकसत्ता

वसई : अपुरे मनुष्यबळ, विविध प्रकारच्या निर्माण होणाऱ्या अडचणी यामुळे शेतकऱ्यांना पारंपरिक शेती करणे कठीण होऊन बसले आहे. अशातच पालघर जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन पोट्रेमध्ये भात रोपांची नर्सरी व यंत्राचा वापर करून आधुनिक पद्धतीने भात शेतीची लागवड करण्यास सुरुवात केली आहे.

पालघर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या भागात मोठ्या प्रमाणात भात शेतीची लागवड केली जाते. परंतु भात शेतीची लागवड करताना आर्थिक गणिते व इतर समस्या निर्माण होत असल्याने बहुतेक शेतकरी भातशेती करणे टाळू लागले आहेत. भात लागवड करण्यासाठी मजूर मिळत नाहीत तर दुसरीकडे भाताची लागवड करण्यासाठी रोपांची खणण्यापासून ते एक एक रोपांची वाकून लागवड केली जाते. यामुळे पाठदुखी व कंबरदुखी अशा त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यासाठी आता वाडा येथील सुप्रसिद्ध शेतकरी अनिल पाटील व इतर शेतकऱ्यांनी इतर झाडांच्या रोपाप्रमाणेच लालमाती व कंपोस्ट खताचा वापर करून पोट्रेमध्ये भात रोपांची नर्सरी तयार केली आहे. शेतकऱ्यांचा रोपांच्या खणण्यासाठी लागणार वेळ व श्रम दोन्ही वाचू लागले आहे. जवळपास १०० एकर जमिनीवर भात लागवड करता येईल एवढ्या रोपवाटिका तयार करण्यात आल्या आहे. या तयार केलेल्या रोपवाटिका शेतकऱ्यांना लागवडीसाठी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे कृषिभूषण अनिल पाटील यांनी सांगितले आहे.

आताच्या काळात शेती करण्यासाठी साधारणपणे ६४ टक्के खर्च येत असतो. एवढी मेहनत करूनही शेतकऱ्यांच्या हाती काही लागत नाही. यासाठी आधुनिक पद्धत वापरून शेती करण्यासाठीचा प्रकल्प उभा करण्यात आला आहे. शेतकऱ्यांचा गट तयार करून शेतकऱ्यांना शेती कसण्यासाठी बळ देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. या पद्धतीने जर शेतीची लागवड केल्यास आर्थिक खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न जवळपास २५ ते ३० टक्क्यांनी वाढेल असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला आहे.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

भविष्यविषयक

अ‍ॅस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ७, हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र- कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. २८८८९७०६/ ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070708809-1

(**बाबा** सिकंदर) ऑल इंडिया त्वरित समाधान आम्ही सांगत नाही करून दाखवतो. कमी वेळात घरबसल्या समाधान महावीशीकरण स्पेशालिस्ट. आवडते प्रेम, प्रेमविवाह, सौतनदुश्मन खात्मा, प्रेमात धोका मिळालेल्या प्रियकर प्रेयसी, नवरा बायकोने फोन करा. काम न झाल्यास पैसे परत - 9548933132/ 9756201795.
0070708916-2

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

महत्त्वपूर्ण निवेदन
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अ‍ॅडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातींतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतेही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
जीवनसाथी

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

नेमबाजीतील जगज्जेतीशी संवाद

क्रिकेटचा प्रभाव मोडून नेमबाजीसारख्या खेळात स्वतंत्र अस्तित्व निर्माण केलेल्या आणि या खेळात देशभर आदर्श ठरलेल्यांमध्ये **अंजली भागवत** हे नाव अग्रणी आहे. सचिन तेंडुलकर वगळता राजीव गांधी खेलरत्न हा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार मिळवलेल्या त्या केवळ दुसऱ्या मराठी भाषक.

एनसीसी कॅडेट ते जगज्जेतेपद नि राष्ट्रकुल सुवर्णपदक असा हा थरारक प्रवास करणाऱ्या अंजली भागवत यांना आपण भेटणार आहोत ‘लोकसत्ता’च्या सहज बोलता बोलता या वेबसंवादात.

बोलत बोलत सहज सहभागी व्हावे असा कार्यक्रम
लोकसत्ता... सहज बोलता बोलता....

अंजली भागवत,
बहुविध पदकविजेत्या नेमबाज

लोकसत्ता सहज बोलता बोलता

कधी : शुक्रवार, २४ जुलै २०२०
वेळ : सायंकाळी ५ वाजता

* नियम व अटी लागू. प्रवेश मर्यादित

त्यांना भेटण्यासाठी तुम्ही करायचं ते इतकंच...
- http://tiny.cc/LS_SahajBoltaBolta_24July या लिंकवर जाऊन नोंदणी करा.
- नोंदणी करून झाल्यावर आमच्याकडून तुम्हाला ई-मेल आयडीवर संदेश येईल.
- याद्वारे २४ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता या वेब-संवादात सहभागी होता येईल.
- अधिक माहितीसाठी http://www.loksatta.com या संकेतस्थळाला भेट द्या.